अमरावती विभागातील पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी आढावा घेण्याबाबत समिती गठित करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३६/अ-२
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक:- ०७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र. ३६/अ-२, दिनांक २७ मार्च, २०१५.
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आस्था), दिनांक ०९ सप्टेंबर, २०१५
३. शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आस्था), दिनांक २२ जून, २०१६

प्रस्तावना :

अमरावती विभागातील पाटबंधारे विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी प्रकल्पांचा आढावा घेण्याबाबत अपर मुख्य सचिव(वित्त) यांचे अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र.१ येथील दि.२७.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ५ नुसार वरील समितीस सहाय्य करण्यासाठी उपसचिव यांची उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे.

मा. राज्यपाल महोदयांच्या दिनांक १०.०३.२०१५ रोजी निर्गमित निदेशातील कलम १५ नुसार सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांना देण्याबाबत व त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे, जलसंपदा विभागाच्या वरील संदर्भाकित क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच संदर्भाकित क्र. ३ येथील शुद्धिपत्रकानुसार प्रशासकीय व आर्थिक तपासणीकरीता जलसंपदा विभाग, वित्त विभाग व नियोजन विभागातील उप सचिवांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन निर्णय दि.२७.०३.२०१५ मधील परि.क्र.५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीची आवश्यकता नाही. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या विनंतीनुसार संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुद्धीपत्रक :-

संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णय दिनांक २७ मार्च २०१५ मधील परिच्छेद ५ व ६ वगळण्यात येत आहे.

तसेच उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.७ येथील “सदर समितीने केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर १५ दिवसांनी मा. मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येईल” याऐवजी “मा. मुख्यमंत्री यांचे निदेशानुसार सदर समितीने केलेल्या कार्यवाहीबाबत मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादरीकरण करावे” असे वाचावे.

उर्वरित मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०७१२४१५९२११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2017.11.07 12:29:47 +05'30'

(सु. कि. गावडे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.मंत्री (वित्त आणि नियोजन व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) सर्व विभागीय आयुक्त
१६) सर्व जिल्हाधिकारी
१७) सहसचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) उप सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) उप सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव ,जलसंपदा विभाग ,मंत्रालय ,मंबई
२१) सहसचिव (भूसंपादन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२) उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
२३) निवडनस्ती (अ-२).